<table>
<tr><td rowspan="4">MHRT050005552019</td><td>दाखल तारीख</td><td>:</td><td>०६.०६.२०१९</td></tr>
<tr><td>नोंदणी तारीख</td><td>:</td><td>०६.०६.२०१९</td></tr>
<tr><td>निकाल तारीख</td><td>:</td><td>१०.०३.२०२६</td></tr>
<tr><td>कालावधी</td><td>:</td><td>वर्ष महिने दिवस<br>०६ ०९ ०४</td></tr>
</table>

भाग 'अ'

(फौजदारी नियमावली प्रकरण ६ परिच्छेद ४४ (i))

**खेड येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी (न्यायालय क्र.२) यांचे न्यायालयात**

**(पिठासीन अधिकारी डी. जी. म्हस्के)**

**(जाहीर दिनांक १०.०३.२०२६ )**

**नियमित फौजदारी खटला क्र. ३२/२०१९**

**निशाणी क्र. २४/ब**

**फिर्यादी** **महाराष्ट्र सरकार तर्फे**
खेड पोलीस ठाणे,
ता. खेड, जि. रत्नागिरी

**प्रतिनिधीत्व** सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्रीम. ए. ए. सोलंकी.

**आरोपी** **१. संतोष अनंत मोरे,**
वय – ४२ वर्षे, व्यवसाय– शेती,
रा. कांदोशी, सुतारवाडी, ता. खेड जि. रत्नागिरी.

**प्रतिनिधीत्व** आरोपी करिता वकील श्री.ए.एस.भोसले.

भाग 'ब'

(फौजदारी नियमावली प्रकरण ६ परिच्छेद ४४ (ii))

| | |
|---|---|
| गुन्ह्याची तारीख | ३०.०३.२०१९ |
| फिर्याद पोलीस ठाण्यात नोंद झाल्याची तारीख | ३१.०३.२०१९ |
| दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केल्याची तारीख | ०६.०६.२०१९ |
| आरोपीविरुध्द दोषारोप ठेवल्याची तारीख | ११.११.२०१९ |

| | |
|---|---|
| पुरावा नोंदविण्यास प्रारंभ केल्याची तारीख | १८.०२.२०२२ |
| निकालाची आरक्षीत तारीख | लागू नाही. |
| निकालाची तारीख | १०.०३.२०२६ |
| जर शिक्षा दिली तर त्या आदेशाची तारीख | लागू नाही. |

## आरोपीचा तपशिल

| आरोपी क्रमांक | आरोपीचे नाव | अटकेची तारीख | जामीनावर सोडल्याची तारीख | दोषारोप ठेवलेले गुन्हे | निर्दोष मुक्त केले की शिक्षा केली | दिलेली शिक्षा | फौप्रसं कलम ४२८ करिता संपरीक्षे दरम्यान निरुध्द केलेला कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | संतोष अनंत मोरे | -- | ०२.०४.२०१९ | भा.दं.वि.चे कलम ३२३, ३२४, ५०४ | निर्दोष मुक्त केले. | -- | निर्दोष मुक्त केल्यामुळे लागू नाही. |

**भाग 'क'**
**(फौजदारी नियमावली प्रकरण ६ परिच्छेद ४४ (iii))**

## सरकारी पक्षातर्फे साक्षीदारांची यादी

### अ. सरकारी पक्ष

| क्रमांक | नाव | पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ज्ञ साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) |
|---|---|---|
| अ.सा.१ | भिकूराम सखाराम सकपाळ | पंच साक्षीदार |
| अ.सा.२ | किसन दगडू पवार | पंच साक्षीदार |

### ब. बचावाचे साक्षीदार

| क्रमांक | नाव | पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ज्ञ साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) | निशाणी क्रमांक |
|---|---|---|---|
| नाही. | | | |

### क. न्यायालयीन साक्षीदार

| क्रमांक | नाव | पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ज्ञ साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) | निशाणी क्रमांक |
|---|---|---|---|
| नाही. | | | |

## सरकारी/बचाव/न्यायालयीन कागदोपत्री निशाणांची यादी

### अ. सरकारी

| क्रमांक | नाव | पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ज्ञ साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| १. | १५ | साक्षीदार क्र.१ यांची पंचनाम्यावरील सही |
| २. | १७ | साक्षीदार क्र.२ यांची पंचनाम्यावरील सही |

## ब. बचाव

| क्रमांक | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| नाही. | | |

## क. न्यायालयीन निशाण्या

| क्रमांक | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| नाही. | | |

## मुद्देमाल

| क्रमांक | मुद्देमाल वस्तू क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | ज.मु.नं. ३१/२२ | एक दोन फूट लांबीचा जंगली लाकडी दांडका एका टोकाला वाकलेला. गोलाई ५ इंच |

## न्यायनिर्णय

## (जाहीर दिनांक – १०.०३.२०२६)

प्रस्तुतचा खटला आरोपी विरुध्द भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ३२४, ३२३ व ५०४ अन्वये शिक्षापात्र असलेल्या गुन्ह्यासाठी चालविण्यात आला आहे.

**अभियोग पक्षाची थोडक्यात हकीकत खालीलप्रमाणे–**

**०२.** फिर्यादी प्रकाश शंकरराव मोरे वय ७४, व्यवसाय शेती, रा.कांदोशी सुतारवाडी, ता. खेड, जि. रत्नागिरी यांनी दि. ३१.०३.२०१९ रोजी खेड पोलीस ठाणे येथे समक्ष हजर होऊन फिर्याद दिली की, वरील ठिकाणी त्यांचे राहते घर असून तेथे फिर्यादी, त्यांचा पुतण्या गणेश अनंत मोरे, सून गितांजली व नातू जय अशी माणसे राहतात. त्यांचे सामाईक घराचे दुस–या भागामध्ये आरोपी हा त्याचे कुटुंबासह राहतो. आरोपी हा फिर्यादी यांचा छोटा पुतण्या आहे. त्यांची पत्नी व मुलगा मयत झाल्यापासून ते त्यांचा पुतण्या गणेश याचे सोबत राहत आहेत. त्यांचा पुतण्या गणेश व आरोपी जागेजमिनीवरून व व्यवसायावरून वाद आहेत. आरोपी हा फिर्यादीस तुम्ही गणेशकडे राहू नका असे बोलून शिवीगाळ दमदाटी करत असतो. दि.३०.०३.२०१९ रोजी ०२.३० वाजता फिर्यादी हे गणेश याचे दुकानाचे

बाजूला लाकडी बाकावर आराम करत झोपलेले असताना आरोपी हातात लाकडी दांडा घेऊन त्याठिकाणी आला व फिर्यादीस शिवीगाळ करून मी तुला सांगितले आहे ना की तू मोठया पुतण्याकडे राहू नको असे असताना सुध्दा तू त्याच्याकडे का राहतो असे म्हणाला. फिर्यादीने त्यांनी कोणाकडे राहायचे हा त्यांचा वैयक्तिक प्रश्न आहे असे सांगितले. तेव्हा त्याचा राग मनात धरुन आरोपीने फिर्यादी यांना लाकडी दांडक्याने दोन्ही खांद्यावर, दोन्ही छातीचे खालील बाजूस बरगडीवर, उजवे पायाचे पोटरीवर, पाठीवर मारहाण करून शिवीगाळ करुन मारण्याची धमकी दिली. त्यामुळे फिर्यादी यांनी पोलीस स्टेशन खेड येथे फिर्याद दिली.

०३. सदरची फिर्याद गु.र.नं.८९/२०१९ ने खेड पोलीस ठाणे येथे नोंदविली व त्याचा तपास म.पो.हे.कॉ/३९६ आर. जी. बुरटे यांनी केला. तपासादरम्यान त्यांनी घटनास्थळाचा तसेच मुद्देमाल जप्तीचा पंचनामा केला. साक्षीदारांची टिपणे नोंदविली. तपास पुर्ण झालेनंतर आरोपी विरुध्द दोषारोपपत्र दाखल केले.

०४. माझे पुर्व पिठासिन अधिकारी यांनी आरोपी विरुध्द भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ३२४, ३२३ व ५०४ अन्वये दंडनिय अपराध केल्याबाबत दोषारोप (नि.८) ठेऊन त्यांची जबानी (नि.९) नोंदविण्यात आली. त्यामधील मजकूर आरोपीस वाचून व समजावून सांगितला. आरोपीने गुन्हा कबूल नसल्याचे सांगितले व संपरिक्षेची मागणी केली.

०५. आरोपी विरुध्दच्या गुन्ह्याच्या सिध्दतेकरीता अभियोग पक्षाने एकुण दोन साक्षीदारांना तपासले. आरोपी विरुध्द अभिलेखावर पुरावा न आल्याने त्याचे फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ३१३ अन्वये निवेदन वगळणेत आले.

०६. अभियोग पक्षातर्फे वकील श्रीम. ए. ए. सोलंकी व आरोपीकरीता वकील श्री. ए. एस. भोसले यांचा युक्तीवाद ऐकला. सदर प्रकरणात खालील मुद्दे निघतात. ते मुद्दे व त्यावरील माझे निष्कर्ष कारणांसहित खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | दिनांक ३०.०३.२०१९ रोजी १४.३० वाजता मौजे कांदोशी सुतारवाडी, ता. खेड, जि. रत्नागिरी येथे आरोपीने फिर्यादी यांना धोकादायक साधनांचा वापर करुन स्वेच्छेने दुखापत केली व त्याद्वारे भारतीय दंड विधानाचे कलम ३२४ प्रमाणे शिक्षेस पात्र असलेला गुन्हा केला असल्याचे अभियोग पक्षाने सिध्द केले काय ? | **नकारार्थी** |
| २. | वर नमूद दिनांक, वेळी व स्थळी आरोपीने फिर्यादी यांना स्वेच्छेने दुखापत केली व त्याद्वारे भारतीय दंड विधानाचे कलम ३२३ प्रमाणे शिक्षेस पात्र असलेला गुन्हा केला असल्याचे अभियोग पक्षाने सिध्द केले काय ? | **नकारार्थी** |
| ३. | वर नमूद दिनांक, वेळी व स्थळी आरोपीने फिर्यादी यांना शिवीगाळ केली व अपमान करून सार्वजनिक शांततेचा भंग होईल असे कृत्य केले व त्याद्वारे भारतीय दंड विधानाचे कलम ५०४ प्रमाणे शिक्षेस पात्र असलेला गुन्हा केला असल्याचे फिर्यादी पक्षाने सिध्द केले काय ? | **नकारार्थी** |
| ४. | काय आदेश ? | **निर्दोष मुक्त केले.** |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र. १ ते ३ करीताः–**

**०७.** मुद्दा क्र.१ ते ३ हे एकमेकांशी संलग्न असल्यामुळे त्यांचे विवेचन करताना घटनांची पुर्नरावृत्ती टाळण्यासाठी ते सर्व एकत्रात चर्चिले आहेत. सदर प्रकरणाचा फिर्यादीने आरोपी विरुध्दचे दोषारोप निःसंशयरित्या सिध्द केले आहे का हे पाहणे अत्यंत आवश्यक आहे.

०८. गुन्ह्याच्या सिध्दतेकरीता अभियोग पक्षाने भिकूराम (सा.क्र.१) यांची साक्ष नि. १४ वर नोंदवली असून त्यांच्या पुराव्यात त्यांनी असे कथन केले की, दि. ३१.०३.२०१९ रोजी काय भानगड झाली हे माहिती नाही किंवा आठवत नाही. त्यांचे समक्ष कोणताही पंचनामा केला नव्हता व काही जप्त केले नाही. दि. ३१.०३.२०१९ रोजीचा पंचनामा दाखविला असता त्यावर त्यांची सही असलेचे त्यांना मान्य केले असले तरी त्यातील मजकूर त्यांना सांगता येणार नाही व त्यांना केस बद्दल काही सांगावयाचे नाही. सदर साक्षीदारांचा उलटतपास आरोपीचे वकीलांनी नाकारला.

०९. किसन (सा.क्र.२) यांची साक्ष नि. १६ वर नोंदवली असुन त्यांचे पुराव्यात असे आले आहे की, दि. ३१.०३.२०१९ रोजी काय भानगड झाली हे माहिती नाही किंवा आठवत नाही. त्यांचे समक्ष कोणताही पंचनामा केला नव्हता व काही जप्त केले नाही. दि. ३१.०३.२०१९ रोजीचा पंचनामा दाखविला असता त्यावर त्यांची सही असलेचे त्यांना मान्य केले असले तरी त्यातील मजकूर त्यांना सांगता येणार नाही व त्यांना केस बद्दल काही सांगावयाचे नाही. त्यांच्या उलटतपासात त्यांनी पोलीसांनी पूर्वीच तयार केलेल्या पंचनाम्यावर सहया केल्याचे सांगितले.

१०. सदर साक्षीदारांनी अभियोग पक्षास कोणतेही सहकार्य केले नाही. त्यांच्या पुराव्यात आरोपी विरुध्द कोणतेही कथन आले नाही.

११. सदर प्रकरणातील समोर आलेल्या पुराव्याचे अवलोकन केले असता कथित दिनांक, वेळी व ठिकाणी आरोपीने फिर्यादी यांना धोकादायक शस्त्र काठीने मारुन स्वेच्छेने दुखापत केली, मारहाण करुन स्वेच्छेने दुखापत केली, शिवीगाळ केली व ठार मारण्याची धमकी दिली याबाबत सबळ पुरावा अभिलेखावर आलेला नाही. सदर प्रकरणात फिर्यादी यांना समन्स व वॉरंट काढून देखील ते साक्ष देण्याकामी हजर झाले नाही. तपासलेले दोन्ही साक्षीदार आरोपी विरुध्द कोणतेही कथन करत नाहीत. अभियोग पक्षाने पुढील साक्षीदार तपासले नाहीत. सदरचे प्रकरण जुने असल्यामुळे व १८.०२.२०२२ नंतर अभियोग पक्षाने एकही साक्षीदार हजर न केल्यामुळे अभियोग पक्षाचा पुरावा बंद करण्यात आला. अभियोग

पक्षाने भा.दं.वि. कलम ३२४, ३२३ व ५०४ चे कोणतेही घटक सिध्द केले नाही. तपासण्यात आलेले दोन्ही साक्षीदार अभियोग पक्षास सहकार्य करत नाही व फिर्यादी यांना वॉरंट काढून देखील ते सदर पत्त्यावर मिळून येत नाही किंवा साक्ष देण्यासाठी हजर देखील राहत नाही. त्यामुळे फिर्यादीच्या तक्रारीतील नमुद कथनाप्रमाणे घटना घडली होती किंवा नाही याबाबत संशय निर्माण होतो. सदर संशयाचा फायदा आरोपीस होतो. वरील विवेचनावरून असे दिसून येते की, अभियोग पक्ष आरोपी विरुध्दचे दोषारोप संशयापलिकडे सिध्द करत नाही. सबब, मी मुद्दा क्र. १ ते ३ चे निष्कर्ष नकारार्थी नोंदवत आहे.

**मुद्दा क्र. ४ करीताः–**

**१२.** मुद्दा क्र. १ ते ३ चे नकारार्थी निष्कर्ष विचारात घेता आरोपी निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे. सदर प्रकरणातील जप्त मुद्देमाल ज.मु.नं.३१/२२ एक जंगली लाकडी दांडका हा मुल्यहिन व उपयोग शुन्य असल्यामुळे अपिल कालावधी संपल्यानंतर नाश करणे योग्य होईल. सबब, मी मुद्दा क्र. ४ करीता खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## :: आदेश ::

**१.** आरोपीची भारतीय दंड विधान, १८६० चे कलम ३२४, ३२३ व ५०४ अन्वये शिक्षेस पात्र असणा–या आरोपांतून फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम २४८(१) प्रमाणे निर्दोष मुक्तता करण्यात येते.

**२.** आरोपीचे वैयक्तीक जातमुचलके व जामीन कदबे रद्द करण्यात आले.

**३.** सदर प्रकरणातील फिर्यादी व आरोपी यांचे विरुध्दचे वॉरंट परत बोलविण्यात यावे.

**४.** सदर प्रकरणातील जप्त मुद्देमाल ज.मु.नं.३१/२२ एक जंगली लाकडी दांडका मूल्यहिन व उपयोग शुन्य असल्यामुळे अपिल कालावधी संपल्यानंतर नियमाप्रमाणे नाश करण्यात यावा.

**५.** या न्यायनिर्णयाच्या विरोधात जर वरिष्ठ न्यायालयात अपील दाखल करण्यात आल्यास, हे न्यायालय आरोपीला सुचित करेल त्यावेळेस आरोपी न्यायालयात हजर होईल या

ग्वाहीकरीता आरोपीला सहा महिन्याच्या काळासाठी रक्कम रू. ५,०००/- चा वैयक्तीक जातमुचलका व तितक्याच रक्कमेचा जामिन फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ४३७-अ प्रमाणे द्यावा.

**(सदरचा न्यायनिर्णय हा खुल्या न्यायालयात टंकलिखीत करुन घोषित करण्यात आला.)**

Digitally signed by MHASKE DADA GOPINATH
Date: 2026.03.11 18:34:37 +0530

**(डी. जी. म्हस्के)**

**दिनांक – १०.०३.२०२६**

**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी**

**(न्यायालय क्र. २), खेड, ता. खेड**

CERTIFICATE

| | | |
|---|---|---|
| Case No. | : | R.C.C. No. 32/2019 |
| I affirm that the contents of this pdf file Judgment/order are same word as per original Judgment/order. | | |
| Name of Clerk | : | Shri. J. D. Ambekar |
| Court Name | : | 2nd Jt. CJJD & JMFC, Khed |
| Date of Decision | : | 10.03.2019 |
| Judgment /Order signed by P.O. on | : | 10.03.2019 |
| Judgment /Order uploaded on | : | 11.03.2019 |